<u>(इंग्रजी टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)</u>

**[(1995) 3 एस. सी. आर.111]**

कमला शंकर

- विरुद्ध -

बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशनचे संचालक,

कानपूर आणि इतर

31 मार्च 1995

(न्यायमूर्ति के. रामास्वामी आणि न्यायमूर्ति एन. वेंकटचल.]

**शिक्षण कायदा:**

*विद्यार्थी - परीक्षा -- निकालाची घोषणा - संबंधित निर्देश :*

**उच्च न्यायालयासमोरील रिट याचिका प्रलंबित असल्याने अपीलकर्त्यांने या न्यायालयाकडून पदविका अभ्यासक्रमाच्या चौथ्या वर्षाच्या परीक्षेला बसण्याचे आदेश प्राप्त केले, परंतु निकाल जाहीर झाला नाही. या न्यायालयाने 12 जानेवारी 1986 रोजी अशाच परिस्थितीत पारित केलेल्या आदेशांसारखेच आदेश त्यांनी मागितले.**

**याचिका निकाली काढतानां या न्यायालयाने असे मान्य केले की -**

**उत्तरवादींना परीक्षेचा निकाल जाहीर करण्याचे निर्देश देण्यात आले. जर अपीलकर्ता परीक्षेत उत्तीर्ण झाला, तर इतर अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून जर काही असल्यास पदविका प्रमाणपत्र देण्यास उत्तरवादींना मोकळीक असेल. जर तो परीक्षेत उत्तीर्ण झाला नाही तर तो उत्तरवादींच्या कृतीवर प्रश्न विचारण्यास त्याला अधिकार राहणार नाही. [११२-सी, डीजे].**

दिवाणी अपीलीय न्यायाधिकारीता : दिवाणी अपील क्रमांक ४५९७/१९९५.

सी.एम.डबलू.पी.क्रमांक १६२२३/१९८३ मधील अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिनांक २२/०७/१९८५ च्या निकाल आणि आदेशावरून.

अपिलार्थी एम. पी. शोरावाला यांच्यासाठी : सुश्री संध्या गोस्वामी.

उत्तरवादी आर. बी. मिश्रा यांच्यासाठी : सुश्री रचना गुप्ता.

न्यायालयाद्वारे खालील प्रमाणे आदेश देण्यात आला :

अनुमती देण्यात आली.

दोन्ही पक्षांच्या वकिलांचे म्हणणे ऐकून घेतले.

याच न्यायालयाने दिनांक 12 जानेवारी 1986 रोजी अशाच परिस्थितीत रमेश या अपीलकर्त्याने दिलेल्या चौथ्या वर्षाच्या पदविका अभ्यासक्रमाच्या परीक्षेचा निकाल जाहीर करण्याचे निर्देश सरकारला दिले आणि त्यानी अशी हमी दिली होती की जर तो परीक्षेत उत्तीर्ण झाला तर तो त्या लाभास पात्र ठरू शकतो आणि जर तो अयशस्वी झाला तर तो परीक्षेच्या निकालावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी कोणतीही लेखी याचिका उच्च न्यायालयात दाखल करणार नाही. येथे अपीलकर्त्याने देखील हाच दिलासा मागीतला आहे .

असे लक्षात येते की उच्च न्यायालयासमक्ष प्रलंबित रीट याचिकेत अपीलकर्त्याने चौथ्या वर्षाच्या परीक्षेला बसण्याचे आदेश मिळवले, परंतु निकाल जाहीर करण्यात आलेला नाही. परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतरही नोंदी उपलब्ध असल्यास, उत्तरवादींना परीक्षेचा निकाल जाहीर करण्याचे निर्देश देण्यात आले. अपीलार्थी परीक्षेत उत्तीर्ण झाल्यास, उत्तरवादीसाठी नियमांनुसार तर नियमांनुसार आणि इतर अटी असतील तर त्या पूर्ण करण्याच्या अधीन राहून पदविका प्रमाणपत्र देण्याची मोकळीक असेल. जर अपीलकर्ता परीक्षेत उत्तीर्ण झाला नाही, तर तो प्रकरणाचा शेवट आहे. उच्च न्यायालयात पुढील कोणतीही रिट याचिका दाखल करून उत्तरवादींच्या कृतीवर प्रश्न विचारण्यास तो पात्र असणार नाही.

त्यानुसार अपील निकाली काढण्यात आले आहे. खर्चा बाबत काहीही आदेश नाही.

**टी. एन. ए.** **अपील निकाली काढण्यात आली.**

## <u>अस्वीकरण</u>

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास

त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x